**कृपया प्रसिद्धीसाठी** **7 मार्च 2014**

## श्री.राम नाईक, भाजपा नेते आणि माजी पेट्रोलियम मंत्री व भाजपा मुंबई अध्यक्ष आणि आमदार ॲड. श्री. आशिष शेलार यांनी 7 मार्च 2014 रोजी मुंबई येथे पत्रकार परिषदेत वितरीत केलेले निवेदन

### *मुंबईतील काँग्रेस खासदारांकडून खासदार निधी वापरात अक्षम्य हेळसांड*

**मुंबई, शुक्रवार :** ''मुंबईतील काँग्रेस-राष्ट्रवादीच्या 6 खासदारांनी त्यांना उपलब्ध असलेल्या खासदार निधीचा जनतेच्या हिताकरीता उपयोग करण्यात अक्षम्य हेळसांड केली आहे. त्याची कारणे या खासदारांनी मुंबईतील जनतेला सांगावीत'', असे आवाहन भाजपा नेते आणि माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक व भाजपा मुंबई अध्यक्ष आणि आमदार ॲड. श्री. आशिष शेलार यांनी आज मुंबईत एका संयुक्त पत्रकार परिषदेमध्ये केले.

यासंबंधी अधिक माहिती देताना श्री. राम नाईक म्हणाले,''मुंबईत सर्वश्री मिलिंद देवरा, एकनाथ गायकवाड, गुरुदास कामत, संजय निरुपम आणि श्रीमती प्रिया दत्त असे काँग्रेसचे पाच खासदार आहेत तर श्री. संजय पाटील हे राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार आहेत. या सहाही खासदारांना 2009-10 ते 2013-14 या 5 वर्षांसाठी प्रत्येकी 19 कोटी रुपयांचा खासदार निधी उपलब्ध होता. परंतु त्यापैकी प्रत्येकाला भारत सरकारने 11 कोटी 85 लाख रुपयांचा निधी दिला कारण नियमात बसतील अशा प्रकारची कामे सुचवून ती कार्यान्वित करण्यास या खासदारांना अपयश आले. त्यामुळे प्रत्येक खासदाराला रु. 7 कोटी 15 लाख निधी मिळू शकलेला नाही, म्हणजेच रु. 42 कोटी 90 लाखंची कामे होऊ न शकल्यामुळे मुंबईतील नागरिकांना मिळणा-या सुविधांपासून वंचित रहावे लागलेले आहे. याच्या कारणांचे प्रत्येक खासदाराने आपल्या मतदार संघातील नागरिकांना स्पष्टीकरण दिले पाहिजे.''

2009-10 आणि 2010-11 या दोन वर्षांसाठी प्रत्येक खासदाराला वर्षाला 2 कोटी रुपयांचा तर 2011-12, 2012-13, 2013-14 या तीन वर्षांसाठी प्रत्येक वर्षाला रु. 5 कोटी याप्रमाणे एकूण 19 कोटी रुपयांचा निधी वापरला गेला पाहिजे होता. ''मुंबईतील या सहा खासदारांनी येत्या आठवड्यात निधी न वापरण्याची कारणे उत्तरदायित्वाच्या तत्त्वास अनुसरुन न सांगितल्यास मुंबईकर नागरिक त्यांच्या अक्षम्य हेळसांडीला कधीच क्षमा करणार नाहीत,'' असेही श्री. राम नाईक आणि श्री. आशिष शेलार यांनी शेवटी सांगितले.

**(कार्यालय सचिव)**